# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. ५५/२००६/ दिनांक :

| | |
|---|---|
| १) श्री. सुभाष वसंत मांडरे,<br>सि.स.नं. २३८९, धनेश्वर अपार्टमेंट,<br>सोन्या मारूती चौक,<br>कोल्हापूर | तक्रारदार |
| **विरूध्द** | |
| १) कार्यकारी अभियंता (का.) तथा<br>नोडल ऑफीसर, म.रा.वि.वितरण कं.लि.,<br>संवसु मंडळ कार्यालय, कोल्हापूर.<br>२) कार्यकारी अभियंता(संवसु)<br>म.रा.विद्युत वितरण कंपनी मर्यादित.<br>शहर विभाग, कोल्हापूर.<br>३) सहाय्यक अभियंता (संवसु).<br>म.रा.विद्युत वितरण कंपनी मर्यादित.<br>संवसु पश्चिम उपविभाग दुधाळी,जि.कोल्हापूर<br>४) शाखा कार्यालय,<br>म.रा.विद्युत वितरण कंपनी मर्यादित.<br>संवसु पश्चिम उपविभाग दुधाळी, जि.कोल्हापूर<br><br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित तर्फे | विरूध्द पक्षकार |

**कोरम :-** १) श्री. के.व्ही. पाटील, अध्यक्ष
२) श्री. जी.सी. लेले, सदस्य
३) एम.बी. भाजीभाकरे, सदस्य-सचिव

महाराष्ट्र वीज नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतूदीनुसार.

तक्रारदार यांनी प्रस्तुतचे अपील दि. ११/९/२००६ रोजी या ग्राहक तक्रार निवारण मंचामध्ये दाखल केले आहे. तत्पूर्वी त्यांनी दि. १४/९/२००५ रोजी अंतर्गत तक्रार निवारण कक्षामध्ये विहित क्ष नमुन्यात तक्रार दाखल केली होती. तथापि त्याकामी कक्षाने एका वर्षाच्या मुदतीत सुनावणी ठेवली नाही. तसेच आदेशही पारीत केले नाहीत. त्यामुळे तक्रारदारांना महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ चे कलम ६.४ नुसार प्रस्तुतचे अपील दाखल करणे भाग पडले आहे.

सदरचे अपीलावरून अर्जदारांची प्रमुख तक्रार खालील प्रमाणे असल्याचे दिसून येते.

कोल्हापूर शहरातील धनेश्वर अपार्टमेंटमध्ये निवासी असलेल्या फ्लॅट धारकांचेवतीने बिल्डरने वि.प. यांना विहीत नमुन्यांत अर्ज करून कमर्शिअल दराने येणारे बील घरगुती करून मिळावे, मागील फरकाची रक्कम परत मिळावी तसेच प्रत्येक फ्लॅटधारकास नवीन कनेक्शन मिळावे अशी विनंती कार्यकारी अभियंता(शहर), महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, कोल्हापूर यांना केली होती. तथापि त्यांनी या तक्रारीचे निवारण न केल्याने अर्जदार यांना मंडल पातळीवरील अंतर्गत तक्रार निवारण कक्षामध्ये दि. १४/९/२००५ रोजी तक्रार नोंद करावी लागली. तेथेही कक्षाचे अध्यक्षांनी सुनावणीची तारीख नेमली नाही. तसेच कक्षाने ६० दिवसांचे मुदतीत निकाल देणे बंधनकारक असतांना एक वर्षाचा कालावधी होऊन गेला तरी कोणताही आदेश पारीत केला नाही. त्यामुळे अर्जदारांना मंचामध्ये प्रस्तुतचे अपील दाखल करणे भाग पडले आहे. अर्जदारांचे म्हणण्याप्रमाणे सदरच्या इमारतीमधील सध्या चालू असलेला वीज पुरवठा एकाच कॉमन मिटरवर चालू आहे. तरी परंतू आजतागायत वीज पुरवठयाबद्दल कोणतीही तक्रार नाही. तसेच व्होल्टेज अथवा कमी जासत दाबाची एकही तक्रार नाही. त्याचप्रमाणे फ्युज कॉलची एकही तक्रार वि.प. कडे करण्यांत आलेली नाही. नवीन कनेक्शनसाठी लागणारी सर्व मिटर्स वि.प. कडून टेस्टींग करून बसविण्यात आली आहेत. तसेच बसबारही बसविण्यांत आला आहे. तरी कनिष्ठ अभियंता, म.रा.वि.वितरण कं.लि., वेस्ट झोन, साकोली, कोल्हापूर यांनी दिलेल्या चार्टप्रमाणे पैसे भरून घेऊन घरगुती कनेक्शन मिळावे. त्यासाठी नवीन ट्रान्सफॉर्मर बसविण्याची आवश्यकता नाही. कोल्हापूर महानगरपालिकेकडून तक्रारदारांनी दि. १५/१०/२००३ रोजी भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त केलेले आहे. तथापि फ्लॅट धारकांना नवीन कनेक्शन न मिळाल्यामुळे त्यांना कमर्शिअल दराने वीज बील भरावे लागत आहे. तरी त्यांना कोटेशन मिळून नवीन घरगुती कनेक्शन देण्यांत यावे.

मंचाने प्रकरणी सुनावणीची ता. १७/१०/२००६ रोजी नेमली होती. त्यावेळी अर्जदार तसेच वि.प. यांनी असे सांगितले की, धनेश्वर अपार्टमेंट लगत केदारनाथ अपार्टमेंट असून त्यांचीही अशीच तक्रार आहे. सबब केदारनाथ अपार्टमेंट मधील फ्लॅट धारकाशी संपर्क साधून दोन्ही अपार्टमेंट साठी ६३ के.व्ही.चा एक ट्रान्सफॉर्मर बसवून सर्व रहिवाश्यांची तक्रार एकत्रात मिटविता येईल का ? याचा शोध घेण्यासाठी सुनावणीची पुढील तारीख मिळावी अशी उभयपक्षकारांनी विनंती केल्यावरून प्रकरणी दि. १/११/२००६ रोजी सुनावणी ठेवण्यांत आली. सदरचे वेळी तक्रारदार यांनी असे सांगितले की केदारनाथ अर्पामेंट मधील रहिवाश्याशी त्यांनी संपर्क साधला असून केदारनाथ व धनेश्वर अर्पाटमेंटमध्ये निवास करणा-या फ्लॅट धारकांची कॉमनमध्ये ६३ के.व्ही. चा ट्रान्सफॉर्मर बसविण्यास संमती आहे तसेच नवीन कनेक्शन साठी ट्रान्सफॉर्मर खरेदण्यास लागणारी रक्कम व अन्य विहीत रक्कम वि.प. कडे भरणा करण्यास तयार आहेत. मात्र या दोन्ही अपार्टमेंटमध्ये ट्रान्सफॉर्मर बसविण्यासाठी सोईची जागा उपलब्ध नसल्याने त्यालगत असलेली महानगरपालिकेची जागा मिळवून त्यावर ट्रान्सफॉर्मर बसविणे गरजेचे आहे. सदर जागा कोल्हापूर महानगरपालिकेकडून मिळविण्याची जबाबदारी अर्जदार घेत असल्याचे सुनावणीचे वेळी

सांगितले.  तसेच धनेश्वर व केदारनाथ अपार्टमेंट मधील सर्वांचे अर्ज व नवीन निवासी कनेक्शनसाठी लागणारी आवश्यक ती रक्कम भरून देण्याची जबाबदारी अर्जदार यांनी घेतली.  त्यास अनुसरून वि.प. यांनी असे सांगितले की अर्जदार यांनी वरील बाबीची पूर्तता केल्यानंतर याकामी अंदाजपत्रक तयार करण्यांत येऊन त्यावर संबंधितांची मंजुरी घेण्यांत येईल व त्यानंतर लागलीच अर्जदारांना कोटेशन देण्यांत येईल.  अर्जदाराने यानुसार वि.प. कडे रकमेचा भरणा करावा अगर अधिकृत विद्युत परवाना धारकाकडून कन्स्ट्रक्शन करून नियमानुसार देखरेख खर्च वि.प. कडे भरणा करावा म्हणजे अर्जदारांना स्वतंत्रपणे घरगुती कनेक्शन देण्यास वि.प.यांना कसलीही अडचण नाही.  या सर्व बाबीची पूर्तता करण्यास सर्वसाधारणपणे ३ महिन्यांचा अवधी लागेल असे वि.प. यांनी सांगितले मात्र धनेश्वर व केदारनाथ अपार्टमेंटमधील रहिवाश्यासाठी बसवावयाच्या कॉमन ट्रान्सफ ॉर्मरसाठी कोल्हापूर महानगरपालिकेकडून जागा मिळविण्यास होणारा विलंब तसेच धनेश्वर व केदारनाथ अपार्टमेंट मधील सर्व संबंधितांनी करावयाची कागदपत्रांची पूर्तता तसेच नियमाप्रमाणे वि.प. कडे भरणा करावयाची रक्कम प्राप्त करण्यास जो वेळ लागेल तेवढी जादाची मुदत (३ महिन्यांपेक्षा) नवीन कनेक्शन देण्यासाठी वि.प. ना लागेल असे त्यांनी सांगितले.  त्यास अर्जदारांची अनुमती असल्याबद्‌दल त्यांचे प्रतिनिधी श्री. भालकर व कॉन्ट्रॅक्टर श्री. लोमटे यांनी सांगितले.

सुनावणीचेवेळी अर्जदार यांना कनिष्ठ अभियंता (क्वालिटी कंट्रोल), वेस्ट झोन, साकोली कॉर्नर, कोल्हापूर यांनी दिलेल्या पत्रकाशी ज्यामध्ये MSEB या सदराखाली प्रत्येक नवीन कनेक्शन धारकाकडून रू. ६००/– प्रमाणे केलेल्या आकारणीशी तसेच या पत्रकाशी वि.प. यांचा कसलाही संबंध नसल्याचे सांगितले. तथापि याकामी कार्यकारी अभियंता, शहर विभाग, कोल्हापूर यांनी सखोल चौकशी करावी असे मंच निदेश देत आहे.

तक्रारदार यांचे प्रतिनिधी श्री. भालकर, कॉन्ट्रॅक्टर श्री. लोमटे तसेच वि.प. यांनी सुनावणीचेवेळी सादर केलेले तोंडी / लेखी म्हणणे व प्रकरणी उपलब्ध असलेला पुरावा विचारात घेता असे दिसून येते की अर्जदार हे धनेश्वर अपार्टमेंटमधील रहिवाशी असून त्यांना सध्या घरगुती कारणासाठी वापरलेल्या वीजेचे बील कमर्शिअल दराने भरावे लागत आहे.  सदरच्या सर्व रहिवाश्यांसाठी एकच कॉमन मीटर असून ते बांधकाम कंत्राटदाराने अपार्टमेंटचे बांधकामावेळी घेतले होते.  त्यानंतर या बांधकामास कोल्हापूर महानगरपालिकेने सन २००३ मध्ये भोगवटा प्रमाणपत्र दिले आहे.  त्यास अनुसरून अर्जदार यांनी सर्व फ्लॅट धारकास नवीन कनेक्शन मिळविण्याविषयी वि.प. यांचेकडे वेळोवेळी विनंती केली होती.  तथापि आजतागायत त्यांची तक्रार निवारण झालेली नाही.  याकामी अर्जदार यांनी अंतर्गत तक्रार निवारण कक्षामध्ये दि. १४/९/२००५ रोजी विहीत नमुन्यांत तक्रार नोंदवूनही एक वर्षाचे कालावधींत कक्षाचे अध्यक्षांनी सुनावणीची तारीख नेमली नाही.  तसेच त्याकामी कोणताही आदेश यापावेतो पारीत केलेला नाही.  दि. १७/१०/२००६ रोजी मंचापुढे झालेल्या सुनावणीचेवेळी कार्यकारी अभियंता, कोल्हापूर मंडळ, कोल्हापूर तथा अध्यक्ष, अंतर्गत तक्रार निवारण कक्ष यांनी स्पष्टपणे कबुल केले की अशी तक्रार कक्षांत दाखल झालेली आहे व त्याचा निकाल अद्याप झालेला नाही, याची त्यांना माहिती नाही.  वीज ग्राहकाची तक्रार निवारण करण–या कक्षाची ही उदासिनता अक्षम्य वाटते.  वीज ग्राहकाच्या तक्रारीचे निवारण शाखा, उपविभाग, तसेच विभागीय पातळीवर न झाल्यास त्याला त्याबाबत कायदेशीर दाद मागता यावी यासाठी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा–हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ चे कलम ६.१ नुसार मंडल पातळीवर अंतर्गत तक्रार निवारण कक्षाची स्वतंत्र व्यवस्था निर्माण करण्यांत आली आहे.  या

व्यवस्थेमार्फ त वितरण परवानेधारकाकडे येणा–या गा–हाण्याची नोंद ठेवण्यांत येऊन त्यांचे वेळीच निवारण करण्याचे अपेक्षित आहे. परंतू कक्षालाच याचा विसर पडत असेल तर या व्यवस्थेची आवश्यकता काय ? असा प्रश्न साहजिकच ग्राहकाला पडला तर नवल वाटायला नको. याची पुनरावृत्ती होऊ नये या दृष्टीने कार्यकारी अभियंता, कोल्हापूर मंडल, कोल्हापूर तथा अध्यक्ष, अंतर्गत तक्रार निवारण कक्ष यांचे वरिष्ठांनी संबंधितांना योग्य त्या सूचना देणे गरजेचे आहे, असे मंचास वाटते.

वर नमूद केल्या प्रमाणे प्रकरणी असलेल्या वस्तुस्थितीचा व महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या तरतुदीचा विचार करून मंच खालील प्रमाणे आदेश देत आहे.

# आदेश

१. तक्रारदार व वि.प. यांनी मान्य केल्याप्रमाणे फ्लॅट धारकांना स्तवंत्रपणे घरगुती कनेक्शन देऊन त्याप्रमाणे बील आकारणी करावी.

२. सदरच्या आदेशाची अंमलबजावणी करून तसे केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ चे कलम ८.३ चे तरतुदीनुसार मंचास दि. ३१/०३/२००७ पर्यंत कळवावे.

३. या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असल्यास त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आत मा. विद्युत लोकपाल “केशवा” बांद्रा–कुर्ला कॉम्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–४०००५१ यांचेकडे करता येईल. तसेच वि.प. यांना अपील करावयाचे असल्यास त्यांना मा.ना. उच्च न्यायालय, मुंबई, अथवा दिवाणी न्यायालयात करता येईल.

| | | |
|---|---|---|
| (एम.बी.भाजीभाकरे) | (जी. सी. लेले) | (के. व्ही. पाटील) |
| सदस्य – सचिव | सदस्य | अध्यक्ष |
| ग्रा.त.नि.मंच,कोप,कोल्हापूर | ग्रा.त.नि.मंच,कोप,कोल्हापूर | ग्रा.त.नि.मंच,कोप,कोल्हापूर |